## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

हो चला वांगणी निवासी
बाबा आहेत अविनाशी
करूया बाबांना नमस्कार
वंदूया बाबांना वारंवार
ठेवूया चरणी शिरभार ॥ धृ॥

बाबा आमुच्या संगे संकटकाळी
चकवा खेळती
स्मरण देऊनी बाबानामे
दावीती सुखमार्गे
दुःख (सारे) हरिती जनांचे ॥ 1 ॥

जमता वांगणी मंदिरी
क्रीडा रास होतसे
भक्तीप्रेम उधळुन
बाबानामे रंगून
भक्तभान हरपून ॥ 2 ॥

बाबा आमचे आहेत
आम्ही बाबांचे आहोत
आहे नाते दुर्मिळ
पाही तो होई धन्य
वाटे मोद फार ॥3 ॥

बाबा आमुच्याकडून होत असतील
लाख चुका असंख्य
करुनी क्षमा म्हमदयांना
हृदयासनी नित्य ठेवा
हीच चरणी वंदना ॥ 4 ॥

★★★★★